# मेट्रो डब्यांचे उच्च दाबाने चार्जिंग सुरू

**मुंबई :** 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३' मार्गिकेतील पहिल्या मेट्रो गाडीच्या चाचणीच्या दिशेने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) एक-एक पाऊल पुढे टाकले आहे. आठ डब्यांची जोडणी केल्यानंतर आता एमएमआरसीने डब्यांचे उच्च दाबाने चार्जिंग सुरू केले आहे.

गाडीचे डबे चार्ज केल्यानंतर अनेक प्रणालीच्या चाचण्या करता येऊ शकतात. त्यामुळे चार्जिंग प्रक्रियेला सुरुवात झाल्याने आता चाचणीच्या दृष्टीने एमएमआरसीने एक पाऊल पुढे टाकले आहे.

आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथून आठ डबे सारीपूत नगर येथील तात्पुरत्या कारशेडमध्ये दाखल झाल्यानंतर आता एमएमआरसीने मेट्रो गाडीची तीन किमी अंतरापर्यंत चाचणी घेण्याचा निर्णय घेतला आहे. ही चाचणी ऑगस्टअखेरीस वा सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने एमएमआरसीने कामाला वेग दिला आहे. गाडीची जोडणी केल्यानंतर आता सोमवारी डब्यांच्या उच्च दाबाच्या चार्जिंगला सुरुवात करण्यात आली. २५ केव्ही-एसी इतक्या दाबाने डबे चार्ज करण्यात येत आहेत. हे डबे चार्ज झाल्यास वातानुकूलित यंत्र, संवाद प्रणालीतील भोंगे, विद्युत यंत्रणा इत्यादींच्या चाचण्या करता येतील. या सर्व चाचण्या यशस्वी झाल्यास गाडीच्या रचनेसंदर्भातील चाचण्या घेता येणार आहेत.